# 1920 नागपूर काँग्रेसचे ऐतिहासिक अधिवेषन : एक सिंहावलोकन

**प्रा. डॉ. चंद्रषेखर संपत पाटील**
इतिहास विभाग प्रमुख
डॉ. मधुकरराव वासनिक पी. डब्ल्यू. एस. कला व
वणिज्य महाविद्यालय, कामठी रोड, नागपूर

## पार्ष्वभूमी

सप्टेंबरमध्ये कोलकत्ता येथे काँग्रेसचे विषेश अधिवेषन भरविण्यात आले. तेथे गांधीजींनी असहकारीतेचा ठराव काँग्रेस व्यासपीठावर मांडला. त्याला बिपीनचंद्र पाल, बॅ. जीना, चित्तरंजनदास, डॉ. ॲनी बेझंट यासारख्या मात्तबरांनी विरोध केला. विदर्भाचे नेते दादासाहेब खापर्डे आणि बाळकृश्ण मुंजे या मध्यप्रांत विदर्भवादी नेत्यांनीही विरोध केला. तरीही गांधीजींच्या बाजूने 1852 तर 908 विरोधात मते पडली. विदर्भाचा भाग हा लोकमान्य टिकळांचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जात होता. म्हणून नागपूरात काँग्रेसचे अधिवेषन घेऊन टिळकांना अध्यक्षपद द्यावे अषी त्यांच्या कार्यकर्त्यांची मनोमन इच्छा होती व म्हणून तषा स्वरुपाची कलकत्ता येथिल विषेश अधिवेषनात मागणी करण्यात आली. असहकार चळवळ संपूर्ण भारतभर चालविली जावी असा प्रचार याच कालावधीत महात्मा गांधी सतत करीत होते व तसा ठराव देखील कलकत्ता अधिवेषनात आलेला होता.

**षब्दसंकेत –** असहकार, ऐतिहासिक, ठराव, अस्पृष्यता, नागपूर.

## जबलपूर विरोधात नागपूर

काँग्रेसचे अधिवेषन नागपूरला घ्यायचे हे ठरले असतांना देखील अखेरच्या क्षणी ते जबलपूरला हलविता येईल का या साठी खूप प्रयत्न केले गेले. परंतू षेवटी यामध्ये नागपूरचाच विजय झाला व अधिवेषन हे नागपूरलाच होणार हे निष्चित झाले. अधिवेषनाच्या तयारीसाठी मुंजे यांची टीम कामाला लागली ते टिळक अध्यक्ष व्हावेत म्हणून खूप प्रयत्नरत होते. याचदरम्यान 1 ऑगस्ट, 1920 रोजी टिळकांचे निधन झाले. आता अध्यक्ष कोणाला करायचे असा प्रष्न उपस्थित झाला. “मुंजेच्या डोळ्यासमोर नाव आले ते योगी अरविंद घोश यांचे ते क्रांतीकारी होते नंतर त्यांनी पाँडेचरीत योगसाधना सुरु केली होती. मुंजेनी त्यांना पत्र लिहले, भेट घेतली.”[1] मी आता राजकीय राहीलेलो नाही असे म्हणत योगींनी मुंजेना नकार कळविला. खूप विनंती केली पण

त्यांनी षेवटी नकार दिला अखेरच्या क्षणी सर्वानुमते मद्रासचे विजय राघवाचार्य यांच्याकडे अध्यक्षपद सोपविले गेले.

**कार्यकत्यांचा उत्साह**

जानेवारी 1920 पासूनच नागपूरची स्थानिक मंडळी हे अधिवेषन यषस्वी करण्यासाठी लोकजागृतीच्या कामाला लागली. अमरावती व नागपूरचे मान्यवर नेते याकरीता सयुक्तरीत्या दौऱ्यावर होते. "नागपूरच्या 'महाराश्ट्र' पत्रानेही या अधिवेषनाचा जोरदार प्रचार सुरु केला. या अधिवेषनाच्या कामासाठी तरुणांना संघटीत करण्याच्या हेतूने डॉ. हेडगेवारांनी भारत स्वयंम सेवक मंडळ स्थापन केले."[2] नागपूर अधिवेषन यषस्वी करण्यासाठी "वर्ध्याचे जमनलाल बजाज यांना स्वागत समितीचे अध्यक्ष बनविण्यात आले तर मोरोपंथ दिक्षित यांना उपाध्यक्ष करण्यात आले. डॉ. मुंजे यांची जनरल सेक्रेटरी म्हणून नेमणूक केली गेली"[3] या व्यतिरिक्त 13 पोट कमिट्याा नेमण्यात आल्या. त्यामध्ये डॉ. परांजपे, डॉ. हेडगेवार, बॅ. अभ्यंकर व खरे यासारख्यांच समावेष होता.

काँग्रेसचे नागपूर अधिवेषन जवळ येऊ लागले तषी देषाच्या कानाकोपऱ्यातील कार्यकर्त्यांची वादळे नागपूरच्या दिषेने घोंगाऊ लागली. "कर्णाटकातून सुमारे 800 कार्यकर्ते नागपूरच्या दिषेने निघाले. गोविंदराव याळवी यांनी स्पेषल रेल्वे ठरविली, लोक हुबळीवरुन पुन्यापर्यंत या गाडीने आले."[4] बाहेरुन आलेले कार्यकर्ते व नागपूरचे कार्यकर्ते यांच्या अधिवेषनापूर्वी सभा भरल्या त्यामध्ये अनेकांनी असहकाराचा विरोध केला तर बहुतांष असहकाराच्या बाजूने उभे होते. बंगालमधून 600 प्रतिनिधी आल्याचा उल्लेख मिळतो.

काँग्रेस नगर परिसरात उभारलेल्या भव्य पेंडॉलमध्ये काँग्रेसच्या अधिवेषनास मोठ्याा उत्साहात सुरुवात झाली. या अधिवेषनात "एकूण 14582 प्रतिनिधी उपस्थित होते. खिलापत चळवळीमुळे मुसलमान बांधवात उत्सुकता निर्माण होऊन प्रेक्षक म्हणून 1050 मुसलमान या अधिवेषनात उपस्थित होते. 169 स्त्री प्रतिनिधी या अधिवेषनात उपस्थित होते."[5] दि. 26 डिसेंबर 1920 ला दुपारी काँग्रेसच्या या ऐतिहासिक अधिवेषनास प्रारंभ झाला.

नागपूर अधिवेषनाचे खास वैषिश्ट्यो म्हणजे "खिलाफत चळवळीमुळे मुसलमान समुदायात उत्सुकता निर्माण झाली. या अधिवेषनात असहयोगाचा ठराव प्रचंड बहुमताने पास झाला. त्याला

विरोध फक्त दोन सदस्यांनी केला. त्या दोन सदस्यापैकी विरोध करणारे एक महंम्मद अली जीना होते. स्वराज्य एका वर्शात प्राप्त करण्यासाठी असहकाराचा ठराव पास करण्यात आला होता तसेच 'टिळक स्वराज्य फंड' या फंडाची निर्मिती करण्यात आली होती."[6] नागपूर अधिवेषनाचे खास वैषिश्ट्यो म्हणजे भारतीय राजकारणाला एक वेगळे वळण प्राप्त झाले होते.

नागपूर अधिवेषनाचे ऐतिहासिक महत्व म्हणजे "भारतीय राश्ट्रीय चळवळीच्या इतिहासात एक नविन वळण मिळाले. कारण भाशिक तत्वावर राज्यपुनर्गठणाचे तत्व मान्य करण्यात आले. मध्यप्रांत वऱ्हाड करीता तीन समित्यांची स्थापना करण्यात आली. 1) वऱ्हाड काँग्रेस समिती, 2) नागप्रदेष काँग्रेस समिती आणि 3) महाकौषल्य काँग्रेस समिती यांचे मुख्यालय क्रमषः अमरावती, नागपूर आणि जबलपूर होते."[7]

नागपूर येथिल ऐतिहासिक अधिवेषनात असहकार चळवळीला गती देण्याकरीता विदर्भातील पुढाऱ्यांचा उदय झाला. त्यांनी जनमानसापर्यंत गांधीजीद्वारा सुरु केलेले असहकार चळवळीचे लोन खेड्यापाड्यापर्यंत पोहचविले.

**गांधी युगाचा प्रारंभ**

काँग्रेसचे नेतृत्व वेगवेगळ्या वेळी वेगवेगळ्या नेत्यांनी केले असले तरी महात्मा गांधी इतका प्रभाव इतर कोणत्याच नेत्याचा पडलेला दिसून येत नाही. काँग्रेसमधिल या गांधी युगाचा प्रारंभ नागपूर अधिवेषनापासून सुरु होते हे विषेश. दक्षिण आफ्रिकेतील अन्याया विरोधात आंदोलन करणारे गांधीजी भारतात आले कधी खेडा तर कधी चंपारण्य अषी आंदोलने करु लागले. रोलेक्ट कायद्याविरोधात मोहिम उघडून त्यांनी संपूर्ण देषाचे लक्ष वेधून घेतले. टिळकांचा मृत्यू 1920 ला झाला आणि गांधी युगाची सुरुवात झाली. कलकत्ता अधिवेषनात असहकारीतेचा ठराव गांधीनी मांडला अनेक बड्या नेत्यांनी सुरुवातीला त्याचा विरोध केला नंतर त्यांनीच त्याला पाठींबा दिला. नागपूर अधिवेषनात महत्वपूर्ण असहकारीतेच्या ठरावावर षिक्का मोर्तब करण्यात आले. या याच अधिवेषनात गांधीच्या नेतृत्वावरील विष्वास व्यक्त करण्यात आला.

**गांधीच्या असहकाराचा कार्यक्रम :–**

- सरकारी षाळेचा विरोध करुन राश्ट्रीय षाळेतून त्यांच्या षिक्षणाची व्यवस्था करणे.
- वकीलांनी आपली वकीला बंद करावी व न्यायालयाच्या कामकाजावर बहिश्कार टाकावा.
- विदेषी वस्तूचा बहिश्कार करुन स्वदेषीचा स्विकार करावा.

- सरकारी कार्यक्रमात व इतरही ठिकाणी सरकारला सहकार्य करु नये. असे ठरले.

**अस्पृष्यता विरोध**

अस्पृष्यता हा भारताला लागलेला कलंक आहे असे म्हणता येईल. अस्पृष्यता भारतातून नश्ट करण्यासाठी अनेक समाजसुधारकांनी प्रयत्न केले. अस्पृष्य हा समाजामधलाच एक भाग असून समाजाच्या बरोबरीने त्यांना जीवन जगता यावे यासाठी काँग्रेसने नागपूर अधिवषेनात प्रयत्न केलेला दिसून येतो. या अधिवेषनात जे क्रांतीकरी ठराव झालेत त्यात अस्पृष्यतेचा विरोध हा ठरावही तेवढाच महत्वपूर्ण होता. या विशयावर गंभीर चर्चा झाली "परिशदेच्या अध्यक्षंनी आपल्या अखत्यारीत 5 सभासदांची नियुक्त करुन अस्पृष्योद्धारक विठ्ठल रामजी यांची निवड केली व त्यांचा सत्कार केला."[8] यातुन काँग्रेस मुठभर श्रीमंत सुषिक्षीतांची न राहता ती सर्वसामान्यांची झाली परिणामी राश्ट्रीय संघटनेपासून दूर राहीलेला दलितांचा वर्ग आता काँग्रेसकडे वळू लागला. याच अधिवेषनात टिळकांच्या नावाने एक कोटी फंड गोळा करण्याचा निर्धार करण्यात आला. वर्ध्याचे जमनलाल बजाज यांनी 1 लाख रु. दिले.

**समारोप**

देषाच्या आणि काँग्रेसच्या इतिहासात 1920 साली नागपूरात झालेले अधिवेषन ऐतिहासिक होते. येथूनच काँग्रेसची रचना बदलली, स्वराज्याचे धेय्य निष्वित झाले, असहकार आंदोलनावर षिक्का मोर्तब झाले. भाशावार प्रांतरचनेचा जागर झाला हे अधिवेषन 26 डिसेंबर 1920 पासून नागपूरातील काँग्रेस नगरमध्ये सुरु झाले होते. 1920 साली नागपूरात झालेल्या काँग्रेस अधिवेषनासाठी महात्मा गांधी रेल्वेने नागपूरात आले होते. त्यांची आठवण एका संगमरवरी दगडावर कोरुन तो चौकूनी दगड प्लॉट फॉम क्र. 2 वर लागवण्यात आला आहे. रेल्वे स्थानकावर येणाऱ्या प्रवाषांना या दगडावरील मजकुर वाचून गांधीजींच्या नागपूर प्रवासाची माहीती मिळते. 100 वर्श पूर्ण झालेल्या काँग्रेसच्या या अधिवेषनाची विषेश आठवण रेल्वे विभागानी अषी जपून ठेवली आहे.

## संदर्भग्रंथ सूची


1) महाराश्ट्र टाईम्स, नागपूर, षनिवार दि. 26 डिसें. 2020.

2) सपा. नागपूर नगरी त्रिषताब्दी इतिहास ग्रंथ, 1702–2000, प्रकाषक, नागपूर नगरी त्रिषताब्दी इतिहास उपसमिती, प्र. आ. 2003, पृ. क्र. 207.

3) कोलारकर ष. गो., आधुनिक विदर्भाचा इतिहास इ. स. 1885 ते 1947, मंगेष प्रकाषन, नागपूर, प्र. आ. 2003, पृ. क्र. 82.

4) महाराश्ट्र टाईम्स, नागपूर, सोमवार दि. 28 डिसें. 2020.

5) पूर्वोक्त, पृ. क्र. 82.

6) पूर्वोक्त, पृ. क्र. 83.

7) वक्काणी नि. आ., आधुनिक विदर्भ का इतिहास, मंगेष प्रकाषन, प्र. आ. 1985, पृ. क्र. 159.

8) महाराश्ट्र टाईम्स, नागपूर, बुधवार दि. 30 डिसें. 2020.

9) बोधनकर सुधीर, अलोनी विवेक, कुलकर्णी मृणाल, “सामाजिक संषोधन पध्दती”, श्री. साईनाथ प्रकाषन, नागपूर 2014.